अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. १३ मे २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : २२३ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## 'बॉर्डर'वर एकही गोळी सुटणार नाही



✔ नवी दिल्ली : एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी (छत्रीशपवीर चेवळ) देशावासीयांना संबोधित करताना पुन्हा एकदा पाकिस्तानला कडक शब्दात इशारा दिला आहे. दहशवादाच्या मुद्द्यावर कुठलीही तडजोड केली जाणार नाही. पाकिस्तानसोबत (झरझ्ळीरप) चर्चा होईल ती फक्त दहशतवाद आणि पाकव्याप्त काश्मीर या मुद्द्यांवरच होईल, असे मोदींनी ठणकावून सांगितले. तर, दुसरीकडे भारत आणि पाकिस्तान यांच्यात आज पुन्हा एकदा शस्त्रसंधींबाबत सायंकाळी ५ वाजता चर्चा झाली. दोन्ही देशांच्या डीजीएमओमध्ये फोनवरुन संभाषण झाला. त्यानुसार, पुन्हा एकदा शस्त्रसंधींवर एकमत झाल्याचे भारतीय सैन्य दलाकडून सांगण्यात आलं आहे. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी पत्रकार परिषद घेऊन शस्त्रसंधीची जाहीर केल्याची माहिती दिली होती.

# आण्विक ब्लॅकमेल कराल तर भारत घातक हल्ला करेल

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पाकला दिले निर्वाणीचे तीन इशारे

✔ नवी दिल्ली/प्रतिनिधी

**पंतप्रधान नरेंद मोदी यांनी मंगळवारी रात्री ऑपरेशन सिंदूरची कारवाई झाल्यानंतर प्रथमच देशाशी संवाद साधला. पाकिस्तानला अद्दल घडवल्याबद्दल त्यांनी तीनही दलाच्या सैनिकांच्या शौर्याला तसेच शास्त्रज्ञांना आणि गुप्तचर यंत्रणांना सुरूवातीला सलामी दिली.पाकिस्तान विरोधातल्या ऑपरेशन सिंदूरला स्थगिती दिली आहे. ते संपलेले नाही पाकिस्तानवर आमची नजर आहे. जर पाकिस्तानने आगळीक केली तर असेच उत्तर देण्यात येईल कोणतेही आण्विक ब्लॅकमेल भारत सहन करणार नाही.ते जर कुणी करत असेल तर त्याचा आधार घेवून वाढणाऱ्या दहतवादावर भारत घातक हल्ला केल,असा खणखणीत इशाराही त्यांनी पाकिस्तानला दिला.मोदी यांनी आपल्या भाषणात पाकला तीन निर्वाणीचे इशारे दिले आहेत.**

यापुढे भारतावर दहशतवादी हल्ला झाला, तर सडेतोड उत्तर दिले जाईल. आम्ही आमच्या पद्धतीने, आपल्या अटींवर उत्तर देणारच. दशतवादाची मूळे जिथे गाडली आहेत त्याच भागांवर आम्ही कारवाई करणार असल्याचा पहिला इशारा त्यांनी दिला.

कोणतेही आण्विक ब्लॅकमेल भारत सहन करणार नाही. त्याचा आधार घेऊन वाढणाऱ्या दहशतवादावर भारत घातक हल्ला करेल,अशी दुसरी वार्निंग त्यांनी दिली. आपण दहशतवाद्यांचे सरकार आणि दहशतवाद्यांचे म्होरके यांना वेगळे मानणार नाही.हा तिसरा इशारा त्यांनी दिला. ऑपरेशन सिंदूरदरम्यान जगाने पाकिस्तानचे ते निंदनीय सत्य पाहिले आहे जेव्हा मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांना शेवटचा निरोप देण्यासाठी पाकिस्तानी सैन्याचे मोठमोठे अधिकारी उपस्थित होते. राज्य पुरस्कृत दहशतवादाचा हा मोठा पुरावा आहे. आपण भारत आणि भारतीय नागरिकांना कोणत्याही धोक्यापासून वाचवण्यासाठी सातत्याने निर्णायक पावले उचलत राहू. युद्धाच्या मैदानावर आपण प्रत्येक वेळी पाकिस्तानला चारीमुंड्या चित केले आहे. यावेळी ऑपरेशन सिंदूरने नव्या पद्धतीला सुरुवात केली आहे,असेही ते म्हणाले.

आपण वाळवंट व डोंगराळ भागात आपल्या क्षमता सिद्ध केल्या आहेत. त्याचबरोबर न्यू एज वॉरफेअरमध्ये आपल्या क्षमता सिद्ध केल्या आहेत. या मोहिमेत आपल्या भारतीय बनावटीच्या शस्त्रास्त्रांची क्षमता सिद्ध झाली आहे. आज जग पाहात आहे की २१ व्या शतकाती युद्धनीतीत भारतीय बनावटीच्या शस्त्रास्त्रांची वेळ आली आहे. सर्व प्रकारच्या दहशतवादाविरोधात आपल्या सगळ्यांचं एकत्र राहणं, आपली एकता आपली सर्वात मोठी शक्ती आहे. नक्कीच हे युग युद्धाचं नाही. पण हे युग दहशतवादाचंही नाही.




### सिंदूरने धडा शिकवला

आमच्या बहिणीचे कुंकू पुसणाऱ्यांना ऑपरेशन सिंदूरने धडा शिकवला''सैन्याने प्रचंड शौर्य दाखवले. आम्ही दहशतवाद्यांचा खात्मा करण्यासाठी सैन्याला पूर्ण स्वातंत्र्य दिले. दहशवाद्याचा हा विभत्स चेहरा आहे. दहशतवाद्यांना मातीत गाडण्यासाठी आपण भारतीय सैन्य दलास संपूर्ण मोकळीक दिली होती. आमच्या आया-बहिणीचं कुकूं पुसण्याचा परिणाम काय होतो, हे आम्ही दाखवून दिले, अशा शब्दात मोदींनी ऑपरेशन सिंदूरचे वर्णन केलं. आमच्या पर्यटकांना त्याांच्या कुटुंबियांसमोर मारण्यात आले. देशातील वातावरण, सुसंवाद बिघडवण्याचा प्रयत्न करण्यात आला. ऑपरेशन सिंदूर ही न्यायाची अखंड प्रतिज्ञा आहे,असेही मोदी म्हणाले.

### दहशतवादीच एक दिवस त्यांना नष्ट करतील

दहशतवाद आता भारत सहन करणार नाही. पाकिस्तानचक सरकार दहशतवाद्यांना ज्या प्रकारे पोसते आहे त्यावरुन हे दिसते आहे की हे दहशतवादी एक दिवस पाकिस्तानला संपवतील. पाकिस्तानला त्यांचा दहशतवादी ढाचा उदध्वस्त करावा लागेल. टेरर आणि टॉक एकत्र चालणार नाही. पाणी आणि रक्ताचे पाटही एकत्र वाहणार नाही. आज मी सगळ्या जगाला सांगतो जर पाकिस्तानशी चर्चा करायची असेल तर ती पाकव्याप्त काश्मीर आणि दहशतवादी कारवाया यांच्यावरच होईल. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण झाले पाहिजे यासाठी भारत शक्तिशाली असणे गरजेचं आहे. आवश्यक असल्यास या शक्तीचा प्रयोगही सक्तीचा ठरतो. मागच्या काही दिवसांमध्ये भारताने हेच केले आहे. मी पुन्हा एकदा भारतीय सैन्य दलांना सशस्त्र दलांना सॅल्युट करतो असेही मोदींनी शेवटी म्हटले.



# तुर्कीतील सफरचंदांवर पुण्यात व्यापाऱ्यांचा बहिष्कार




✔ **पुणे** : पुणे: पाकिस्तानबरोबर युद्धजन्य परिस्थितीत तुर्कीने पाकिस्तानला पाठिंबा दिल्याने तुर्कीतील सफरचंदांवर पुण्यातील मार्केट यार्डातील व्यापाऱ्यांनी बहिष्कार घातला आहे. तुर्कीतून सफरचंदे खरेदी करायची नाहीत, असा निर्णय व्यापाऱ्यांनी केला आहे. सध्या काश्मीरमधील सफरचंदांची आवक ठप्प असून, बाजारपेठांमध्ये इराणमधील सफरचंदे उपलब्ध आहेत.

पुण्यातील फळबाजारात इराण, वॉशिंग्टन, न्यूझीलंड, तसेच तुर्कीतून सफरचंदे विक्रीस पाठविली जातात. शीतगृहात साठवणूक करण्यात आलेली ही सफरचंदे वर्षभर उपलब्ध असतात. परदेशी सफरचंद आकर्षक आणि चकचकीत दिसतात. मात्र, पोषणमूल्य विचारात घेता काश्मीर, हिमाचल प्रदेशातील सफरचंदांचे सेवन आरोग्याच्या दृष्टीने हितकारक मानले जाते. बागेतून तोडून ही सफरचंदे देशभरात विक्रीस पाठविली जातात, अशी माहिती मार्केट यार्डातील श्री गुरुदेव दत्त फ्रूट एजन्सीचे संचालक, सफरचंद व्यापारी सत्यजित सुयोग झेंडे यांनी दिली. इराणमधील सफरचंदांचा हंगाम शेवटच्या टप्प्यात आल्यानंतर तुर्कीतील सफरचंदांचा हंगाम सुरू होतो. तुर्कीतील सफरचंदाची आयात बंद झाली आहे, असे झेंडे यांनी स्पष्ट केले. काश्मीरमधील सफरचंद पुणे, मुंबईतील बाजारपेठेत पाठविण्यात येते.

व्यापारी काश्मीरमधील शेतकऱ्यांकडून थेट खरेदी करतात. मध्यंतरी काश्मीरमध्ये झालेल्या पावसामुळे रस्ते वाहतुकीवर परिणाम झाला.

# व्यापार थांबवण्याचा दम भारताच युद्ध थांबले

## ट्रम्प यांचा दावा



✔ **नवी दिल्ली** : भारत आणि पाकिस्तानने जर शस्त्रसंधी केली नाही तर आम्ही कोणताही व्यापार करणार नाही. जर या दोन्ही देशांनी माघार घेतली तर आम्ही व्यापारात वाढ करू असा इशारा दिल्यानंतर भारत आणि पाकिस्तानने शस्त्रसंधी केल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला. या दोन्ही देशांमध्ये तणाव कमी झाल्यामुळे अणुयुद्धाचा धोका टळला आणि कोट्यवधी लोकांचा जीव वाचला असल्याचेही ट्रम्प म्हणाले.

ट्रम्प म्हणाले, ''शनिवारी माझ्या प्रशासनाने भारत आणि पाकिस्तानमध्ये तात्काळ युद्धविराम घडवून आणण्यास मदत केली. मला वाटते की, ही कायमस्वरूपी युद्धविराम असेल. भारत आणि पाकिस्तानचे नेतृत्व युद्धासाठी ठाम होते. मी म्हणालो की जर तुम्ही युद्ध थांबवले नाही तर आम्ही व्यापार करणार नाही.''

**भारताकडून खंडन... :** भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदीचे श्रेय घेण्याच्या शर्यतीत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी पुन्हा एकदा मोठा दावा केला. त्यांनी दावा केला की दोन्ही देश अणुशक्ती आहेत. माझ्या प्रशासनाने दोन्ही देशांमध्ये युद्धबंदी आणण्यास मदत केली. अमेरिकेचा दावा भारताकडून खोडून काढण्यात आला.

**नौदलाचे वर्चस्व... :** भारताचे व्हॉईस ॲडमिरल एएन प्रमोद म्हणाले की, ''आपले पायलट्स आपल्या विमानात दिवसरात्र काम करण्यास सक्षम आहेत. आमच्या हद्दीपासून काही किलोमीटर अंतरावर शत्रूच्या कोणत्याही विमानाला येऊ दिले जात नव्हते. शेकडो किलोमीटर अंतरावर कोणतेही विमान येऊ शकत नव्हते. आम्ही आमच्या क्षेपणास्त्रविरोधी तंत्रज्ञानाची पडताळणी केली. आमचे शक्तिशाली युद्ध गट निर्भयपणे काम करण्यास सक्षम होते. यामुळे पाकिस्तान्यांना माघार घेण्यास भाग पाडले. त्यामुळे पाकिस्तानला सीमेजवळ राहण्यास भाग पाडले.'' ते पुढे म्हणाले की, भारतीय नौदलाच्या वर्चस्वामुळे हे स्पष्ट झाले की, जर आपल्याला हवं असेल तर आपण आपल्या इच्छेनुसार हल्ला करू शकतो.

# विक्रांतचे लोकेशन विचारणाऱ्याला अटक

## 'पीएमओ'मधील अधिकारी बनून केला होता फोन



### आयनएस विक्रांत

आयएनएस विक्रांत ही भारताची पहिली विमानवाहू युद्धनौका आहे जी पूर्णपणे देशात तयार करण्यात आली आहे. सप्टेंबर २०२२ मध्ये ही युद्धनौका कोची शिपयार्ड येथे बांधण्यात आली. ही युद्धनौका ४० लढाऊ विमाने ऑपरेट करू शकते, ज्यामध्ये मिग-२९के लढाऊ विमानांचे दोन स्क्वॉड्रन आणि सुमारे १० काम ोव का-३१ हेलिकॉप्टरचा समावेश आहे. तसेच ही युद्धनौका ६४ बराक क्षेपणास्त्रांनी सज्ज आहे.

✔ **नवी दिल्ली** : आयएनएस विक्रांत या युद्धनौकेबद्दल माहिती मि ळवण्यासाठी पंतप्रधान कार्यालय (पीएमओ) चा अधिकारी असल्याची बतावणी करणाऱ्या एका केरळच्या कोझिकोडमधील एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुजीब रहमान असे असून तो एलाथूरचा रहिवासी आहे. दरम्यान भारतीय नौदलाकडून देण्यात आलेल्या तक्रारींनंतर या व्यक्तीवर ऑफिशियल सिक्रेट ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रिपोर्ट्सनुसार, त्याने आयएनएस विक्रांतची माहिती का मिळवण्याचा प्रयत्न केला याबद्दल त्याची चौकशी केली जाणार आहे.

दरम्यान, आरोपी मुजीब रहमान याने पीएमओ, राघवन येथील अधिकारी असल्याचे भासवून आयएनएस विक्रांतच्या ठिकाणाबद्दल माहिती मागितली, असे वृत्त आहे. कोची येथील नौदल कमांड मुख्यालयात यासंबंधीचा फोन करण्यात आला होता.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




दहशतवाद हा घातक, हे त्यांना कधी कळणार?

संगम श्री डे
167-43-580

संगम श्री नाईट
279-88-260

कल्याण
233-82-336

मुंबई
234-94-248

# पाकिस्तान मानवतेसाठीही धोकादायक, आम्ही घाबरलो नाही

## सीमावर्ती भागात राहणाऱ्या मुस्लिमांना काय वाटते?

✔ श्रीनगर

भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदीला दोन दिवस उलटले आहेत. आता जीवन हळूहळू पूर्वपदावर येत आहे. परंतु, राजस्थानच्या सीमावर्ती भागात राहणाऱ्या मुस्लिमांना पाकिस्तानवर अजिबात विश्वास नाही. पाकिस्तान हा दुटप्पीपणा दाखवणारा देश आहे. मानवतेसाठी तो देश धोकायदायक आहे. त्यामुळे आपण सतर्क राहिले पाहिजे, असे मत सीमावर्ती भागात राहणाऱ्या मुस्लिम समाजातील लोकांनी व्यक्त केले आहे.



पाकिस्तानचा इतिहास वाईट आहे. आम्ही त्यांना अजिबात घाबरलो नाही. कारण भारतीय सैन्यावर आमचा पूर्ण विश्वास आहे. जोपर्यंत शूर सैनिक तिथे आहेत, तोपर्यंत पाकिस्तान आमचे कोणतेही नुकसान करु शकत नाही. जैसलमेरचे मुस्लिम म्हणतात की, त्यांना त्यांच्या सैन्याचा आणि सरकारचा अभिमान आहे. गरज पडल्यास आम्ही पाकिस्तानविरुद्ध युद्ध लढण्यास आणि त्याला योग्य धडा शिकवण्यासही तयार आहे.

### फसवणूक करणार देश

भारत पाकिस्तान सीमेला लागून असलेल्या राजस्थानमधील जैसलमेरमध्ये राहणारे लोकांनी देखील पाकिस्तानबाबत वाईट अनुभव असल्याचे सांगितले. पाकिस्तान हा नेहमीच फसवणूक करणार देश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने अवघ्या तीन दिवसांत पाकिस्तानला गुडघे टेकायला लावल्याचे लोकांनी सांगितले.

### पाकिस्तान मानवतेसाठीच धोकादायक

सीमावर्ती भागातील मुस्लिम लोकांनी दिलेल्या माहितीनुसार, भारतात राहणारे सर्व लोक आपापसात भाऊ आहेत. जेव्हा देशाच्या सुरक्षिततेचा, सन्मानाचा आणि स्वाभिमानाचा प्रश्न येतो तेव्हा सर्व भारतीय आपले मतभेद विसरून एकत्र उभे राहतात. याबद्दल कोणीही गैरसमज बाळगू नये. तर पाकिस्तान हा केवळ भारतासाठीच नाही तर मानवतेसाठीही एक मोठा धोका आहे आणि तो नष्ट केला पाहिजे असे मतही अनेक लोकांनी व्यक्त केले.

शस्त्रसंधी लागू केल्यानंतर देखील पाकिस्तानकडून भारतावर ड्रो हल्ले करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. तसेच सीमेवर गोळीबार देखील करण्यात आला होता. त्यानंतर पाकिस्तानचे खरे रंग जगासमोर आले होते. दरम्यान, भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धबंदी जरी झाली असली तरीह अद्याप पाकिस्तानला दिलासा मिळाला नाही. कारण भारताने अनेक गोष्टींवरील बंदी कायम ठेवली आहेत. त्यामुळे पाकिस्तानच्या अडचणी वाढणार आहेत..